**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**शनिवार दिनांक ०९ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **पश्चिम बंगालमधे भाजपचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शुभेंदु अधिकारी यांनी घेतली शपथ.**
2. **देशाचे नवे सीडीएस म्हणून निवृत्त लेफ्टनंट जनरल एन एस राजा सुब्रमणी यांची नियुक्ती.**
3. **मीरा - भाईंदरमधील २५४ एकर सरकारी जमीन बिल्डरला देण्याच्या हायकोर्टाच्या निकालाविरुद्ध सरकार सर्वोच्च न्यायालयात जाणार -महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळेंची माहिती.**
4. **आगामी काही तासात नागपूरसह विदर्भाच्या अनेक जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता.**

---

शुभेंदू अधिकारी

पश्चिम बंगालमधे भाजपचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शुभेंदु अधिकारी यांनी आज शपथ घेतली. कोलकात्यातल्या ब्रिगेड परेड मैदानात एका भव्य समारंभात राज्यपाल आर.एन. रवी यांनी अधिकारी यांना राज्याचे नववे मुख्यमंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. पाच कॅबिनेट मंत्र्यांनी देखील या वेळी शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा आणि इतर केंद्रीय मंत्री तसंच भाजप-एनडीए शासित राज्यांचे मुख्यमंत्री या कार्यक्रमाला हजर होते. भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी यांचे सहकारी आणि पश्चिम बंगालमधले भाजपाचे ज्येष्ठ कार्यकर्ते माखनलाल सरकार या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार हे दोन्ही उपमुख्यमंत्री शपथविधीला हजर होते. दरम्यान, भाजपची विचारधारा पश्चिम बंगालच्या जनतेनं स्वीकारली असल्याचं पश्चिम बंगालमधल्या भाजपच्या नेत्रदीपक यशातून दिसून येतं. हा सत्ताबदल राज्यात विकासाचा मार्ग मोकळा करेल, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

यांनी केलं. पश्चिम बंगालमध्ये झालेल्या शपथविधी सोहळ्यापूर्वी गडकरी माध्यमांशी बोलत होते.

--------------------------------------

एन.एस.राजा सुब्रमणी

निवृत्त लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांची देशाचे पुढील सीडीएस अर्थात संरक्षण दल प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सध्याचे सीडीएस, जनरल अनिल चौहान यांचा कार्यकाळ ३० मे रोजी संपत आहे. याच दिवशी जनरल एन. एस. राजा सुब्रमणी, पदभार स्वीकारतील आणि संरक्षण मंत्रालयाच्या लष्करी व्यवहार विभागाचे सचिव म्हणूनही काम पाहतील. लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी १ सप्टेंबर २०२५ पासून राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालयात लष्करी सल्लागार आहेत.

--------------------------------------

हेमंत पांडे

डॉ.हेमंत शरद पांडे यांनी काल वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड वेकोलीच्या 'अध्यक्ष-आणि व्यवस्थापकीय संचालक' पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. १९८९ मध्ये 'कोल इंडिया लिमिटेड'मध्ये खाण अभियंता म्हणून आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात करणारे डॉ.पांडे यांना WCL आणि 'साउथ ईस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेड' (SECL) मधील कामाचा ३७ वर्षांचा अनुभव आहे. वेकोलिचे मुख्यालय हे नागपुरात आहे.

--------------------------------------

NCRB

भ्रष्टाचार आणि शेतकरी आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र देशात पहिल्या स्थानी असल्याचं NCRB म्हणजेच राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या २०२४ च्या अहवालातून समोर आलं आहे. महिलांवरच्या अत्याचारात राज्याचा दुसरा क्रमांक आहे. २०२४ मध्ये राज्यात ३ हजार ८२४ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली. तर ४७ हजार ९५४ घटनांमध्ये महिलांवर अत्याचार झाले. तसंच भ्रष्टाचाराची ७२१ प्रकरण उघड झाली आहेत. यावरुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते जयंत पाटील यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. सत्ताधाऱ्यांनी मंगल देशा, पवित्र देशा ही राज्याची ओळख पुसून टाकली असल्याचा आरोप त्यांनी केला. या मुद्द्यांवरुन सरकारला विधीमंडळात विचारलेल्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर मिळाली नसल्याचंही ते म्हणाले.

---------------------------------------

चंद्रशेखर बावनकुळे/विजय वडेट्टीवार

काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार  यांनी मीरा भाईंदरमधील सुमारे २५४ एकर शासकीय जमीन खासगी विकासकांच्या घशात घालण्याचा डाव असल्याचा आरोप राज्य सरकारवर आज नागपूरात प्रसारमाध्यमांशी बोलतांना केला आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतरही सरकारने प्रभावी भूमिका न घेतल्याने सुमारे सहा हजार कोटी रुपयांच्या जमिनीचे नुकसान झाल्याचा दावाही त्यांनी केला. दरम्यान महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यासंदर्भात स्पष्टीकरण देत  राज्य शासनाच्या मालकीची मीरा-भाईंदर येथील जमीन दोन बिल्डरला देण्याच्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाविरुद्ध राज्य सरकारने कंबर कसली असून, या निकालाला सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिकेतून आव्हान देण्यात येणार असल्याची माहिती दिली आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, ही जमीन शासनाच्या मालकीची आहे. महसूल नोंदी बदलून सरकारी जमिनी हडपण्याचे प्रयत्न आम्ही हाणून पाडू असंही ते म्हणाले.

---------------------------------------

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या पूर्वसूचनेनुसार आज विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये वादळी पर्जन्यमानाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला असून उद्या देखील नागपूर सह भंडारा गोंदिया, अमरावती अकोला आणि यवतमाळ जिल्ह्यात येलो अलर्ट कायम राहणार आहे. यादरम्यान विजांच्या कडकडाटासह वादळ येण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे दरम्यान आज सकाळी नागपुरात काही वेळ ढगाळ वातावरण होतं. दुपारनंतर देखील ढगाळ वातावरण असून नागपूरसह अमरावती गोंदिया भंडारा वर्धा आणि गडचिरोली जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, गेल्या 24 तासात वाशिम जिल्ह्यात 42.8 दशांश अंश सेल्सिअस इतक्या कमाल तापमानाची नोंद करण्यात आली, तर नागपूर जिल्ह्यामध्ये 39.2 सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

---------------------------------------

आयपीएल

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज गुजरात टायटन्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात सामना होणार आहे. जयपूर मधल्या सवाई मानसिंग स्टेडिअमवर

संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल. दरम्यान, स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सनं दिल्ली कॅपीटल्सवर ८ गडी तसंच ३४ चेंडू राखून विजय मिळवला. कोलकाताचा हा सलग चौथा विजय तर दिल्लीचा सलग पाचवा पराभव ठरला.

--------------------------------------

नक्षल कमांडर

गडचिरोली जिल्हयातील एटापल्ली तालुक्यातील कृष्णार येथे लग्न समारंभात दिवंगत नक्षल कमांडर माडवी हिडमा याच्यावरील गाण्यावर नृत्य केल्याप्रकरणी पाच आदिवासी युवकांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. ६ मे रोजी झालेल्या या कार्यक्रमादरम्यान डीजेवर संबंधित गाणे वाजवण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. देशविरोधी कृत्यांना प्रोत्साहन मिळेल, असा आरोप ठेवत भारतीय न्याय संहिता आणि मुंबई पोलिस अधिनियमांतर्गत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. गडचिरोली जिल्हयात अशा प्रकारचा गुन्हा दाखल होण्याची ही पहिलीच घटना असल्याचे सांगितले जात आहे.

--------------------------------------

'मेफेड्रॉन'

भंडारा शहरात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं 'मेफेड्रॉन' या अत्यंत धोकादायक आणि प्रतिबंधित अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या एका इसमाला अटक केली. स्थानिक गुन्हे शाखेनं मिळालेल्या गुप्त माहितीनुसार धाड टाकून आरोपी कपिल खोब्रागडे याच्याकडून १२ लाख ६५ हजार रुपयांचं 'मेफेड्रॉन' जप्त केलं.

--------------------------------------

थॅलेसेमिया दिन

जागतिक थॅलेसेमिया दिनानिमित्त अकोला थॅलेसेमिया सोसायटी आणि संकल्प इंडिया फाउंडेशनच्या वतीने थॅलेसेमियाग्रस्त मुलांसोबत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमात मुलांच्या हस्ते केक कापण्यात आला तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन करून चिमुकल्यांना आनंदाचे क्षण देण्यात आले. अकोला थॅलेसेमिया सोसायटी गेल्या ३३ वर्षांपासून थॅलेसेमियाग्रस्त मुलांसाठी कार्यरत असून सुमारे २०० गरजू मुलांना निशुल्क उपचार आणि मदत पुरवित आहे.

--------------------------------------

'रानोबाचा माळ'

वाशीम इथं  लेखक बाबाराव मुसळे पुरस्कृत कला-गंगा ग्रामीण कादंबरी पुरस्कार योजना-२०२५ अंतर्गत ऋषिकेश गोल्हार यांच्या ‘रानोबाचा माळ’ या कादंबरीची सर्वोत्तम ग्रामीण कादंबरी म्हणून निवड करण्यात आली आहे. नवोदित ग्रामीण लेखकांच्या १४ कादंबऱ्यांमधून ही निवड करण्यात आली. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह आणि दहा हजार रुपये रोख असे आहे. ‘रानोबाचा माळ’ ही कादंबरी विस्थापित शेतकऱ्यांच्या संघर्षमय जीवनावर आधारित असून ग्रामीण वास्तवाचे प्रभावी चित्रण करते. परीक्षकांनी कथानकाची गती, ग्रामीण बोली आणि जीवनानुभवांचे जिवंत चित्रण याचे विशेष कौतुक केले.

-------------------------------------

धामणगाव मदतकार्य

नागपूर जिल्हयातील धामणगाव येथे लागलेल्या भीषण आगीच्या घटनेनंतर प्रशासनाने तात्काळ मदतकार्य सुरू केल्याने गावकरी पुन्हा सावरत असल्याचे सरपंच वैशाली चौधरी यांनी सांगितले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काल गावाला भेट देत मदतकार्याचा आढावा घेतला आणि विविध अडचणी तत्काळ सोडविण्याचे निर्देश दिले. बाधित कुटुंबांना किराणा, जनावरांसाठी चारा आणि पशुवैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या असून काही ग्रामस्थांनी नव्या घरांच्या बांधकामालाही सुरुवात केली आहे. दरम्यान, उमरेड येथे झालेल्या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना खत आणि बियाण्यांचा पुरवठा सुरळीत ठेवण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

-------------------------------------

डॉ.अशोक उईके

चंद्रपूर जिल्हयात सुव्यवस्था अबाधित राहावी, तसेच वाढत्या अपघाताला प्रतिबंध घालण्यासाठी पोलिस विभागाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशा सूचना राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री डॉ.अशोक उईके यांनी नूतन जिल्हा पोलिस अधिक्षक आयुश नोपानी यांना दिल्या. चंद्रपूर शहरात गत तीन-चार दिवसात मोठ्या प्रमाणात अपघात होऊन नागरिकांचा बळी गेला आहे, हे अतिशय दुर्दैवी आहे. शहरातून जड वाहनांची अनिर्बंध पद्धतीने वाहतूक होत असल्यास तात्काळ त्यावर कारवाई करावी, अशा सुचना पालकमंत्री यांनी दिल्या.

-------------------------------------

मुदतवाढ

मुंबई विद्यापीठाच्या विना अनुदानित विभागांतील शिक्षकीय पदांमधील विविध प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक आणि संचालक पदांसाठी अर्ज सादर करण्याच्या मुदतीत ११ मे पर्यंत वाढ करण्यात आली आहे. विद्यापीठाने यासंदर्भात अधिकृत सूचना प्रसिद्ध केली आहे. याशिवाय, ऑनलाईन अर्जाची छापील प्रत तसंच शैक्षणिक, अध्यापन आणि संशोधन पात्रतेचे तीन संच विद्यापीठाच्या फोर्ट परिसरातील आवक विभागात सादर करण्याची अंतिम मुदत १५ मे पर्यंत निश्चित करण्यात आली आहे. सर्व संबंधित उमेदवारांनी सुधारित वेळापत्रकाची नोंद घेऊन विहित मुदतीत अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असं आवाहन मुंबई विद्यापीठ प्रशासनाने केलं आहे.

--------------------------------------